# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या २०६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.१४ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ११: ३० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०६ वी तातडीची बैठक **शुक्रवार, दि.१४ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. आय. जे. तांबोळी | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १८) | डॉ. अजयकुमार जाधव,<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**भावपूर्ण श्रध्दांजली:**

अक्कलकोटचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे दि.१३/११/२०२५ रोजी दुख:द निधन झाल्याने व दि.१०/११/२०२५ रोजी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ एक कारमध्ये स्फोट होवून त्यात मृत्यु झालेल्या व्यक्तींसाठी दोन मिनीट स्तब्ध उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

**स्वागत:**

प्रभारी कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच नव्याने नामनिर्देशित झालेले सदस्य डॉ. आय. जे. तांबोळी, प्रभारी अधिष्ठाता (मानवविज्ञान विद्याशाखा) व डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरु महोदय यांचे हस्ते रोप देऊन स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील व डॉ. अजित माधव पाटणकर यांनी आपली अनुपस्थिती Whatsapp/ईमेलद्वारे कळविली असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | १) दि.२६ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि.०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १) दि.२६ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>२) दि.०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली | |
| | आयत्या वेळेचा विषय क्र.३(१) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | व्यवस्थापन परिषदेची बैठक संपन्न झाल्यानंतर विभागाकडून ३ दिवसामध्ये कार्यवृत्तांत तयार करुन कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्ती सुचवायच्या असल्यास, त्या ३ दिवसामध्ये सर्व सदस्यांकडून मागवून घेण्यात याव्यात व त्यानंतर कार्यवृत्तांत अंतिम मंजूरीसाठी मा.कुलगुरुमहोदय यांचेकडे सादर करण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, दि.१६ फेब्रुवारी, २०१९ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेला "२०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४" नुसार कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | **दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील दुरुस्ती ठराव क्र.०१ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेसंबंधी क्रम ठरविण्याबाबत श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची बाब माहितीस्तव.**<br>टिपणी:<br>१) व्यवस्थापन परिषदेच्या दि.२९ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१५(५)<br>२) व्यवस्थापन परिषदेच्या दि.२५ जुलै, २०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.०६.<br>३) व्यवस्थापन परिषदेच्या दि.२५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या बैठकीतील दुरुस्ती ठराव क्र.०१.<br>४) दीक्षांत विभागाची दि. १२/०९/२०२५ रोजीची मान्य टिपणी.<br>संदर्भ क्र. ०२ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा.व्यवस्थापन सदस्य, मा.विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांच्या व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेसंबंधी पारित झालेला संदर्भ क्र. ०१ मध्ये नमूद ठराव दुरुस्तीसाठी मा.व्यवस्थापन परिषदेसमोर सादर केला असता, मा.व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.<br>ठराव: "प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावर बैठक व्यवस्था करण्यात यावी व विद्यापरिषद सदस्य यांची व्यासपीठासमोरील मंडपामध्ये अग्रस्थानी बैठक व्यवस्था करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले."<br>परंतू, संदर्भ क्र. ०३ अन्वये उपरोक्त ठरावामध्ये दुरुस्ती करुन मा. व्यवस्थापन परिषदेने प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा अधिष्ठाता यांच्या व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेसंबंधी क्रम ठरविणेबाबत श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह माहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती.<br>सदर समितीची बैठक दि. १२/०९/२०२५ रोजी दु. १२:३० वा. राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात संपन्न झाली असून, सोबत सदर समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत जोडलेला आहे. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव पारित झाले आहेत. | परीक्षा व मूल्यमापन विभाग (दीक्षांत) |

| | | |
|---|---|---|
| | १) सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा.व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.अधिष्ठाता यांच्या व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेचा क्रम निश्चित करण्यात आला.<br>२) दीक्षांत समारंभादिवशी एकत्रित छायाचित्र घेण्याचे ०४ गट असतील. अ) व्यवस्थापन परिषद सदस्य ब) अधिसभा सदस्य क) विद्यापरिषद सदस्य आणि ड) संविधानिक अधिकारी व विद्यापीठ संकुलांचे संचालक.<br>३) दीक्षांत समारंभादिवशी Procession sequence सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार राहील असे सर्वानुमते ठरले.<br>दि.१८ सप्टेंबर, २०२५ रोजी प्रस्तुत विद्यापीठाचा २१ वा दीक्षांत समारंभ आयोजित केला असल्याने तसेच व्यवस्थापन परिषदेची बैठक नजीकच्या काळामध्ये आयोजित नसल्याने उपरोक्त बैठकीच्या कार्यवृत्तांतास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी संदर्भ क्र. ०४ टिपणीअन्वये मान्यता दिली आहे.<br>सबब, दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील दुरुस्ती ठराव क्र. ०१ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेसंबंधी क्रम ठरविण्याबाबत श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या मान्यतेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादरदिनांक २५ ऑगस्ट, २०२५ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील दुरुस्ती ठराव क्र. ०१ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा. अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेसंबंधी क्रम ठरविण्याबाबत श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची बाब माहितीस्तव. | |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरात कोणतेही अध्यासन केंद्र किंवा संशोधन केंद्र सुरु करावयाचे असतील तर अशा अध्यासन/संशोधन केंद्राच्या समितीचे पदसिध्द अध्यक्ष हे मा. कुलगुरु महोदय असतील, ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे संशोधन केंद्र सुरु करण्यासंदर्भात सदर संशोधन केंद्राच्या समिती सदस्यांबरोबर चर्चा करणे कामी मा. कुलगुरु महोदयांच्या दालनात दिनांक ३०/०९/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत या पुढे जे अध्यासन केंद्र/संशोधन केंद्र प्रस्तुत विद्यापीठ परिसरात सुरु करावयाचे असतील, तर अशा अध्यासन केंद्र/संशोधन केंद्राच्या समितीचे पदसिध्द अध्यक्ष हे मा. कुलगुरु महोदय असतील, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसरात कोणतेही अध्यासन केंद्र किंवा संशोधन केंद्र सुरु करावयाचे असतील तर अशा अध्यासन/संशोधन केंद्राच्या समितीचे पदसिध्द अध्यक्ष हे मा.कुलगुरु महोदय असतील, ही बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आस्थापना विभाग (शिक्षक कक्ष) |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरात कोणतेही अध्यासन केंद्र किंवा संशोधन केंद्र सुरु करावयाचे असतील तर अशा अध्यासन/संशोधन केंद्राच्या समितीचे पदसिध्द अध्यक्ष हे मा. कुलगुरु महोदय राहतील व संबंधित अध्यासन / संशोधन केंद्राच्या सल्लागार समितीमधील वरिष्ठ सदस्य हे कार्याध्यक्ष म्हणून काम पाहतील असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०६/१०/२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातंर्गत सर्व संलग्नित महाविद्यालये व संकुलाकडून आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय /राज्य/विभागीय व विद्यापीठ पातळीवर अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र, कार्यशाळा व परिषदा आयोजनाकरिता प्रतिवर्षी प्रस्ताव मागविण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्य व विभागीय पातळीवर चर्चासत्र, कार्यशाळा, परिषद (Seminar, Workshop & Conference) आयोजनाबाबत व त्याकरिता होणाऱ्या खर्चापोटी विद्यापीठ नियमानुसार काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान रक्कम देणेकरिता विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/अमंवि/२०२५/४१८३ दि.०३/०६/२०२५ व पुअहोसोविसो/अमंवि /२०२५ / ५७६६ दि.१८/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व संकुलाकडून विहित मुदतीत दि.३१/०७/२०२५ पर्यंत दिलेल्या नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार विहित मुदतीत ९५ प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाले आहेत.<br>उपरोक्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी पात्र महाविद्यालये व संकुलाना अनुदान सहाय्य रक्कम आदा करण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांनी अभ्यासमंडळे विभागाच्या दि.१४/०८/२०२५ रोजीच्या टिपणीवर नामनिर्देशन केल्यानुसार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची बैठक दि.०६/१०/२०२५ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.<br>उपरोक्त समितीने एकूण ९५ प्रस्तावांची छाननी/पडताळणी केली असता त्यापैकी ५३ पात्र प्रस्तावांना आर्थिक सहाय्य रक्कम देण्याकरिता शिफारस केलेली असून ४२ प्रस्ताव अनुदान सहाय्य देणेसाठी अपात्र करुन यादी कार्यालयास सादर केली आहे. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत मा. व्यवस्थापन परिषदेच्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडला आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०६/१०/२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | अभ्यासमंडळे विभाग |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीने दि.०६/१०/२०२५ रोजीच्या बैठकीत प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५ ] | **प्रस्तुत विद्यापीठ अधिविभाग व सर्व संलग्नित महाविद्यालयांची पूरग्रस्त बाधितांकरिता जेवढी रक्कम विद्यापीठाकडे जमा होईल तेवढीच रक्कम प्रस्तुत विद्यापीठ फंडातून पूरग्रस्ताकरिता मदत म्हणून जमा करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक भागातील जनजीवन पूर्णत: उध्वस्त झालेले आहे. त्यामुळे अतिवृष्टिने बाधित कुटुंबांना तातडीने मदत करणे आवश्यक आहे. पूरग्रस्तांना कोणत्या स्वरुपाची मदत करावी यासाठी मा. कुलगुरु महोदयांनी एक समिती गठीत केली होती. सदर समितीची बैठक ऑनलाईन दि.१८/१०/२०२५ रोजी दु. १.०० वा. मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली सपन्न झाली. सदर बैठकीच्या अनुषंगाने सायं. ४.०० वा समिती सदस्यांच्या उपस्थितीत ऑनलाईन बैठक घेण्यास सूचित करण्यात आले. सदर बैठकीमध्ये खालील अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.<br>१. डॉ. महेंद्र कदम — अध्यक्ष<br>२. डॉ. शंकर नवले — सदस्य<br>३. डॉ. अनंत शिंगाडे — सदस्य<br>४. डॉ. म्हाळप्पा जगताप — सदस्य<br>६. प्रा. डॉ. राजेंद्र वडजे — सदस्य सचिव<br>१. सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त बाधित गावातील प्राथमिक व माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण मोफत असल्याने सदर पूरग्रस्त विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे योग्य वाटत नसल्याचे एकमत झाले. तरी उच्च माध्यमिक शिक्षण (१२ वी) नंरतचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती गोळा करुन विद्यापीठाने तयार केलेल्या पूरग्रस्त बाधीतासाठी तयार केलेल्या खात्यावरून विद्यापीठाकडून थेट बँक खात्यामधून त्यांना आर्थिक स्वरुपात मदत करण्यात यावी.<br>२. सोलापूर जिल्ह्यातील माढा, मोहोळ, करमाळा, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट या तालुक्यातील पूरग्रस्त भागातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याकरिता संबंधित तालुकानिहाय गावातील | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |

ग्रामसेवक, सरपंच, स्थानिक विरोधी पक्ष, महाविद्यालयीन प्राध्यापक, कार्यक्रम अधिकारी तसेच स्थानिक पत्रकार यांचे एकत्रित यांच्या मार्फत माहिती संकलित करण्यात यावे. सोलापूर जिल्हा सीना नदी भागातील पूरग्रस्त बाधित उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची तालुकानिहाय माहिती संकलित करणेबाबतची जबाबदारी खालील महाविद्यालयांकडे सोपविण्यात आली आहे.

- करमाळा तालुका- यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा
- मोहोळ तालुका- देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ
- बार्शी तालुका- श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी
- माढा तालुका- विठ्ठलराव शिंदे आर्टस कॉलेज, टेंभूर्णी.
- दक्षिण तालुका- संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप.
- उत्तर तालुका माऊली महाविद्यालय, वडाळा.
- अक्कलकोट ता. सी.बी.खेडगीज महाविद्यालय, अक्कलकोट

३. प्रस्तुत विद्यापीठ व सर्व संलग्नित महाविद्यालय यांची जेवढी रक्कम जमा होईल तेवढीच रक्कम प्रस्तुत विद्यापीठ फंडातून पूरग्रस्ताकरिता मदत म्हणून जमा करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

४. सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त बाधित विद्यार्थ्यांची माहिती गुगल फॉर्मद्वारे संकलित करण्यात आली आहे. उक्त फॉर्मद्वारे अंदाजे एकूण ८५०- ९०० विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध झाली आहे.

५. प्रस्तुत विद्यापीठ वित्त व लेखा विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार आजतगायत पूरग्रस्तांकरिता संकलित निधी अंदाजे रु. ४ ते ४.५ लाख पर्यंत रक्कम जमा आहेत.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ अधिविभाग व सर्व संलग्नित महाविद्यालयांची पूरग्रस्त बाधितांकरिता जेवढी रक्कम विद्यापीठाकडे जमा होईल तेवढीच रक्कम प्रस्तुत विद्यापीठ फंडातून पूरग्रस्ताकरिता मदत म्हणून जमा करण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठ अधिविभाग व सर्व संलग्नित महाविद्यालयांची पूरग्रस्त बाधितांकरिता एकूण रुपये ५ लाख जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पूरग्रस्तांकरिता मदत म्हणून जमा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०६ ]</td><td>प्रस्तुत विद्यापीठातील कर्मचारी विद्यार्थी, अभ्यांगत, अधिकारी व कर्मचारी यांना सोलापूर शहर, केगाव व नवीन प्रशासकीय इमारत परिसरामध्ये ये-जा करण्यासाठी ई-रिक्षा Development Part-II अंतर्गत Purchases of Vehicles या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकाखाली खर्ची टाकून खरेदी करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील नवीन विस्तारीत इमारतीमध्ये प्रशासकीय कामकाज सुरु करण्यात येणार आहे. सध्या जुन्या (ग्रंथालय) प्रशासकीय इमारतीतुन प्रशासकीय कामकाज सुरु आहे तेथुन नवीन प्रशासकीय इमारतीस ये-जा करण्यास व सोलापूर शहरामध्ये ये-जा करण्याकरिता डिझेल इंधनाचा वाढता दर विचारात घेता २ ई-रिक्षा (इलेक्ट्रिक) खरेदी करणे प्रस्तावित आहे. त्यानुसार सोलापूर शहरातील मे. पाटील मोटर्स, सोलापूर TVS कंपनीचे सोलापूर व धाराशिव जिल्ह्याचे अधिकृत वितरक असल्याने त्यांचे कडून TVS King EV MAX मॉडेलचे रेफरन्र्स दरपत्रक घेण्यात आले आहे. (ते सोबत जोडलेले आहे) रेफरन्र्स दरपत्रकानूसार १ नग EV Electrical Vehicle करिता रु. ३,५२,९६८/- इतका Ex. Showroom-३,२५,४८७/-, Insurance-८८८०/, R.T.O-५०००/-, Fare Meter-३५००, EV charging Installation-८७००, Accessories-१४०१/- असे एकूण रु.३,५२,९६८/- इतक्या खर्चाचे रेफरन्स कोटेशन प्राप्त झाले आहे.<br>सदर दरपत्रक मे. पाटील मोटर्स, सोलापूर यांनी RTO नियमानुसार खालील प्रमाणे काही अटी व सुचना सांगितल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.
<table>
<tr><td>०१</td><td>सदरचे वाहन हे रिक्षा वाहन चालविण्याचा परवाना असलेल्या व्यक्तीच्याच नावे खरेदी करता येता.</td></tr>
<tr><td>०२</td><td>एका व्यक्तीच्या नावे म्हणजे रिक्षा चालविण्याचा परवाना असलेल्याच्या व्यक्तीच्या नावे केवळ एकच (ई-रिक्षा) वाहन खरेदी करता येतो.</td></tr>
</table>
उपरोक्त सुचना हे उपप्रादेशीक परिवहन कार्यालयाच्या निर्देशाप्रमाणे असल्याबाबत सांगितले आहे.<br>सदर इलेक्ट्रीकल वाहनाची खरेदी ही अंदाजे २५,०००/- पेक्षा जास्त खर्च अपेक्षित आहे.<br>"द महाराष्ट्र समान लेखा संहिता मधील Appendix III पानं नं. ९०/९१ वरील अ.क्र. ४(२) नुसार सर्व प्रकारचे मशिन व इक्विपमेंट रक्कम रु. २५,०००/- वरील खरेदी करिता तांत्रिक समितीने शिफारस केल्यानुसार खरेदी करण्याचे नमुद केलेले आहे."<br>सदरच्या समान लेखा संहिताच्या नियमानूसार तांत्रिक समितीच्या शिफारसीनूसार TVS कंपनीचे अधिकृत वाहन वितरक यांच्याकडून घ्यावे लागणार आहे.<br>सबब, विद्यापीठातील कर्मचारी विद्यार्थी, अभ्यांगत, अधिकारी व कर्मचारी यांना सोलापूर शहर, केगाव व नवीन प्रशासकीय इमारत परिसरामध्ये ये-जा करण्यासाठी ई-रिक्षा Development Part-II अंतर्गत Purchases of Vehicles या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकाखाली खर्ची टाकून खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यतेची बाब विचारार्थ.</td><td>अभियांत्रिकी केंद्र</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>प्रस्तुत विद्यापीठातील कर्मचारी विद्यार्थी, अभ्यांगत, अधिकारी व कर्मचारी यांना सोलापूर शहर, केगांव व नवीन प्रशासकीय इमारत परिसरामध्ये ये-जा करण्यासाठी ई-वाहन घेण्याकरीता रुपये २५ लाखाची तरतूद करण्यास व सदर होणारा खर्च हा Development Part-II अंतर्गत Purchases of Vehicles या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकून खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | प्रस्तुत विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुले, ५०० क्षमतेचे मुली, ५० क्षमतेचे दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनी, ५० क्षमतेचे ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) यांच्याकरीता वसतिगृह, मा.कुलगुरु महोदय व मा.प्र.कुलगुरु महोदय यांचे निवासस्थान, विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थानाचे बांधकाम करणे, विद्यापीठाच्या रंगभवन अभ्यासकेंद्र येथे विद्यार्थी विकास केंद्र इमारत उभारणे, School of Sports Sciences करिता स्वतंत्र इमारत ज्यामध्ये BP.Ed / M.P.Ed / Diploma कोर्सेस / Degree Programme चालू करण्याकरिता इमारतीचे बांधकाम करणे, क्रीडा विभागाकरिता टेक्नो जीम करणे, ॲस्ट्रोर्टफ हॉकी ग्राऊंड तयार करण्याकरिता रु.१११ कोटी कामास प्रशासकीय मान्यता घेऊन सदर बांधकामाकरिता लागणारा अंदाजे १११ कोटी निधी मागणीसाठीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |

टिपणी- प्रस्तुत विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुले, ५०० क्षमतेचे मुली, ५० क्षमतेचे दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनी, ५० क्षमतेचे ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) यांच्याकरीता वसतिगृह, मा. कुलगुरु महोदय व मा. प्र. कुलगुरु महोदय यांचे निवासस्थान, विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थानाचे बांधकाम करणे, विद्यापीठाच्या रंगभवन अभ्यासकेंद्र येथे विद्यार्थी विकास केंद्र इमारत उभारणे, School of Sports Sciences करिता स्वतंत्र इमारत ज्यामध्ये B.P.Ed. / M.P.Ed. / Diploma कोर्सेस / Degree Programme चालू करण्याकरिता इमारतीचे बांधकाम करणे, क्रीडा विभागाकरिता टेक्नो जीम करणे, ॲस्ट्रोर्टफ हॉकी ग्राऊंड तयार करणे ही बांधकामे प्रस्तावित आहेत त्याकरिताचा अंदाजे खर्च तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुलांचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम करणे. | २० कोटी |
| ०२ | विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुलींचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम करणे. | २० कोटी |
| ०३ | विद्यापीठ परिसरामध्ये ५० क्षमतेचे दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनीकरिता वसतिगृह इमारतीचे बांधकाम करणे. | ५ कोटी |
| ०४ | विद्यापीठ परिसरामध्ये ५० क्षमतेचे तृतीयपंथी वसतिगृह इमारतीचे बांधकाम करणे. | ५ कोटी |
| ०५ | रंगभवन अभ्यासकेंद्र येथे विद्यार्थी विकास केंद्र अभ्यासिका इमारतीचे बांधकाम करणे | २० कोटी |
| ०६ | मा. कुलगुरु महोदय व मा. प्र. कुलगुरु महोदय यांच्या निवासस्थान इमारतीचे बांधकाम करणे. | ६ कोटी |
| ०७ | विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थान इमारतीचे बांधकाम करणे. | १० कोटी |
| ०८ | School of Sports Sciences करिता स्वतंत्र इमारत ज्यामध्ये B.P.Ed. / M.P.Ed. / Diploma कोर्सेस / Degree Programme चालू करण्याकरिता इमारतीचे बांधकाम करणे | १० कोटी |
| ०९ | क्रीडा विभागाकरिता टेक्नो जीम करणे, ॲस्ट्रोर्टफ हॉकी ग्राऊंड तयार करणे. | १५ कोटी |
| | एकुण | १११ कोटी |

| | | |
|---|---|---|
| | उपरोक्त तक्त्याप्रमाणे बांधकाम, फर्निचर, इलेक्ट्रीकल व इमारत कामे करण्याकरिता अंदाजे १११ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.<br>सध्या विद्यापीठाकडे विकास निधीची कमतरता असल्यामुळे सदरच्या बांधकामाच्या खर्चासाठी राज्य शासनाकडे निधीची मागणी करावी लागणार आहे.<br>सबब, विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुले, ५०० क्षमतेचे मुली, ५० क्षमतेचे दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनी, ५० क्षमतेचे ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) यांच्याकरीता वसतिगृह, मा. कुलगुरु महोदय व मा. प्र. कुलगुरु महोदय यांचे निवासस्थान, विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थानाचे बांधकाम करणे, विद्यापीठाच्या रंगभवन अभ्यासकेंद्र येथे विद्यार्थी विकास केंद्र इमारत उभारणे, School of Sports Sciences करिता स्वतंत्र इमारत ज्यामध्ये B.P.Ed/M.P.Ed/Diploma कोर्सेस/Degree Programme चालू करण्याकरिता इमारतीचे बांधकाम करणे, क्रीडा विभागाकरिता टेक्नो जीम करणे, ॲस्ट्रोर्टफ हॉकी ग्राऊंड तयार करण्याकरिता रु. १११ कोटी कामास प्रशासकीय मान्यता घेऊन सदर बांधकामाकरिता लागणारा अंदाजे १११ कोटी निधी मागणीसाठीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुले, ५०० क्षमतेचे मुली, ५० क्षमतेचे दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनी, ५० क्षमतेचे ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) यांच्याकरीता वसतिगृह, मा.कुलगुरु महोदय व मा. प्र. कुलगुरु महोदय यांचे निवासस्थान, विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थानाचे बांधकाम करणे, विद्यापीठाच्या रंगभवन अभ्यासकेंद्र येथे विद्यार्थी विकास केंद्र इमारत उभारणे, School of Sports Sciences करिता स्वतंत्र इमारत ज्यामध्ये B.P.Ed / M.P.Ed / Diploma कोर्सेस / Degree Programme चालू करण्याकरिता इमारतीचे बांधकाम करणे, क्रीडा विभागाकरिता टेक्नो जीम करणे, ॲस्ट्रोर्टफ हॉकी ग्राऊंड तयार करण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते शिफारस करण्यात आली.**<br>**तथापि, तक्त्यातील अ.क्र.०५ येथील कामाचे अंदाजीत किंमत रु.२० कोटी ऐवजी रु.१० कोटी करुन शेवटी तंत्रज्ञान संकुले इमारतीचा समावेश करावा व त्याकरीता रु.१० कोटी तरतूद करुन संपूर्ण प्रस्ताव निधी मागणीकरीता राज्य शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०८ ] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलाच्या जमा खर्चाचा ताळमेळ घेऊन समितीचा शिफारस अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलाच्या जमा खर्चाचा ताळमेळ घेण्यासाठी दि.१०/०९/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीत ठराव क्र.१२ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती.<br>सदर समितीमार्फत प्रस्तुत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलाच्या जमा खर्चाच्या ताळमेळ घेण्यासाठी दि.२८/१०/२०२५ रोजी मा. प्र-कुलगुरुमहादेय तथा समिती अध्यक्ष यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीस नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते. समितीचे सदस्य सचिव तथा प्र. कुलसचिव यांनी बैठकीमध्ये शैक्षणिक संकुलाची सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे जमा व खर्चाची माहिती सादर केली. त्यावर सविस्तर चर्चा होवून विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलातील प्रत्यक्ष उत्पन्न (Direct Income) व शैक्षणिक खर्च (Academic Expenditure) बाबत आढावा घेऊन निरीक्षण व शिफारशीसह अहवाल तयार केला असून तो सोबत जोडला आहे. सोबत जोडलेला अहवालातील शिफारशीवर पुढील कार्यवाही कुलसचिव कार्यालयामार्फत करणे आवश्यक असल्यामुळे सदरचा समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाहीसाठी कुलसचिव कार्यालयाकडे पाठविण्यास मान्यता असावी.<br>सबब, व्यवस्थापन परिषद नियुक्त समितीने प्रस्तुत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलाच्या जमा खर्चाचा ताळमेळ प्रत्यक्ष उत्पन्न (Direct Income) व शैक्षणिक खर्च (Academic Expenditure) बाबत आढावा घेऊन सादर केलेला निरीक्षण व शिफारश अहवाल विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलाच्या जमा खर्चाचा ताळमेळ घेऊन समितीने केलेली शिफारस स्विकारुन अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(१)] | **महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक T-२० क्रिकेट स्पर्धा २०२६ आयोजन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रति वर्षी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठात महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक T-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. या स्पर्धेच्या माध्यमातून विविध विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे स्नेंहसंबंध वृध्दिंगत होऊन विचारांची देवाण घेवाण तसेच आरोग्य तंदूरुस्त व निरोगी होण्यास मदत होत असते. सदर स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठाचा कर्मचारी क्रिकेट संघ सहभागी होत असतो.<br>सबब, महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक T-२० क्रिकेट स्पर्धा २०२६ प्रस्तुत विद्यापीठामध्ये माहे जानेवारी किंवा फेब्रुवारी २०२६ मध्ये आयोजन करण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक T-२० क्रिकेट स्पर्धा २०२६ आयोजन करण्यास व होणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [९(२)] | **प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) योजनेतील सॉफ्ट कॉम्पोनंट या घटकांतर्गत फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) करीता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्यासोबत झालेल्या सामंजस्य कराराची बाब माहितीस्तव**<br>टिपणी: प्रधान मंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठास १०० कोटी निधी मंजूर झालेला आहे. सदर निधीमधून सॉफ्ट कॉम्पोनंट या घटकाकरीता एकूण २६८ उपक्रमांसाठी ५ कोटी ६ लाख निधी मंजूर आहे. त्यामधून ४८ उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झालेली असून, पुढील उपक्रम राबविण्यात येत आहेत.<br>मा. राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा), मुंबई यांच्या दि. २५/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) उपक्रम महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्या सोबत समन्वय साधण्याबाबत कळविले आहे.<br>त्यास अनुसरुन विद्यापीठाच्या दि.२२/०८/२०२५ व दि.११/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये पीएम-उषा योजने अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) उपक्रमाबाबत माहिती पाठविण्यात आली.<br>दि.३०/१०/२०२५ रोजी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्या प्राप्त ई-मेलनुसार सामंजस्य करार करणेबाबत कळविण्यात आलेला असून त्यानुसार MSFDA, पुणे येथे दि. ३१/१०/२०२५ रोजी प्रस्तुत विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्याशी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे.<br>सबब, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) योजनेतील सॉफ्ट कॉम्पोनंट या घटकाअंतर्गत फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) करीता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्यासोबत झालेल्या सामंजस्य कराराची बाब माहितीस्तव सादर.) | पीएम-उषा विभाग |
| ठराव: | **प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) योजनेतील सॉफ्ट कॉम्पोनंट या घटकाअंतर्गत फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) करीता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्यासोबत झालेल्या सामंजस्य कराराची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(३)] | दि.०८/१०/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतातास दि.१३/१०/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: दि.०८/१०/२०२५ रोजी झालेल्या खरेदी समितीचा बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेची मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार खरेदी समितीचा कार्यवृत्तांत दि.१३/१०/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीसमोर ठेवण्यात आला होता. त्यास वित्त व लेखा समितीने संपूर्ण कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.<br>सबब, दि.०८/१०/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतात दि.१३/१०/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ. | कुलसचिव कार्यालय (खरेदी व भांडार विभाग) |
| ठराव: | दि.०८/१०/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास दि.१३/१०/२०२५ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच नवीन ईर्टिंगा वाहन घेण्यासाठी खरेदी समितीसमोर विषय सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(४)] | **पीएम-उषा Renovation and Upgradation निधी अंतर्गत भौतिकशास्त्र संकूल येथील इमारतीचे दुस-या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करणे या कामासाठी यापूर्वी नेमणूक केलेल्या वास्तुविशारद मे. कारेकर ॲन्ड असोसिएटस, बंगलोर यांच्याकडून सदर काम काढून घेण्यास तसे त्यांना कळविण्यास व भौतिकशास्त्र संकूल येथील इमारतीचे दुस-या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करणे ऐवजी सामाजिकशास्त्रे संकूल दुस-या (वाढीव) मजल्याचे बांधकाम करणे या कामासाठी मा. कुलपती कार्यालय, मुंबई यांनी निश्चित केलेल्या वास्तुविशारद पॅनेलमधून वास्तुविशारद यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पीएम-उषा Renovation and Upgradation निधी अंतर्गत भौतिकशास्त्र संकूल येथील इमारतीचे दुस-या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करणेचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ सोलापूर या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. सदर कार्यालयाने त्यांच्या दिनांक ३०/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये पीएम-उषा योजने अंतर्गत भौतिकशास्त्र संकूल येथील इमारतीचे दुस-या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करणे या कामासाठी आरसीसी नकाशा उपलब्ध नसल्यामुळे सुरक्षादृष्टीने सदर इमारतीवर वाढीव बांधकाम करण्यास अडचण येत आहेत. तसेच भूकंपरोधक इमारती उभी करण्यासाठी समस्या येत आहेत. त्यामुळे तांत्रिक मंजुरी देणे शक्य होणार नाही. अश्या परिस्थितीत मजला वाढ केल्यास भविष्यात सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक परिस्थिती तयार होवू शकते. सदर निधी हा विद्यापीठ परिसरातच दुसरे ठिकाणी वापरण्यास या विभागाची हरकत नाही असे कळविले आहे. सदर कामासाठी रूपये १,०५,६०,०००/- (रूपये एक कोटी साठ हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे.<br>सदर कामासाठी तांत्रिक मंजुरी देणेकरीता येत असलेली अडचण कळविले आहे. सदर इमारतीच्या बांधकामासाठी यापूर्वी वास्तुविशारद म्हणून मे. कारेकर ॲन्ड असोसिएटस, बंगलोर यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांनी तयार केलेले अंदाजपत्रक व नकाशा सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ सोलापूर या कार्यालयास सादर करण्यात आले होते. परंतु सदर कार्यालयाने तांत्रिक मंजुरी देणे शक्य होणार नसल्यामुळे भौतिकशास्त्र संकूल ऐवजी सामाजिकशास्त्रे संकूल दुस-या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करण्यासाठी परवानगीचा Minor Revision प्रस्ताव रूसा कार्यालय, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. | पीएम-उषा विभाग |

| | | |
|---|---|---|
| | तसेच दिनांक ३१/१०/२०२५ मा. राज्य प्रकल्प संचालक, रुसा कार्यालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली व मा. कुलगुरु महोदय व मा. प्र-कुलसचिव यांच्या उपस्थितीत New Construction, Renovation and Upgradation, Equipment's आणि Soft Component इ. बाबत येत असलेल्या अडचणीबाबत महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, (MSFDA) पुणे येथे सविस्तर बैठक आयोजित करण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ सोलापूर या कार्यालयाने कळविल्यानुसार तांत्रिक मंजुरी देणे शक्य होणार नसल्यामुळे भौतिकशास्त्र संकूल ऐवजी सामाजिकशास्त्रे संकूल दुस-या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करण्यासाठी परवानगीचा विहित प्रस्ताव तात्काळ सादर करण्याबाबत सदर बैठकीत निर्देश दिले आहेत.<br><br>सबब, पीएम-उषा Renovation and Upgradation निधी अंतर्गत भौतिकशास्त्र संकूल येथील इमारतीचे दुस-या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करणे या कामासाठी यापूर्वी नेमणूक केलेल्या वास्तुविशारद मे. कारेकर ॲन्ड असोसिएटस, बंगलोर यांच्याकडून सदर काम काढून घेण्यास तसे त्यांना कळविण्यास व भौतिकशास्त्र संकूल येथील इमारतीचे दुस-या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करणे ऐवजी सामाजिकशास्त्रे संकूल दुस-या (वाढीव) मजल्याचे बांधकाम करणे या कामासाठी मा. कुलपती कार्यालय, मुंबई यांनी निश्चित केलेल्या वास्तुविशारद पॅनेलमधून वास्तुविशारद यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **पीएम-उषा Renovation and Upgradation निधी अंतर्गत भौतिकशास्त्र संकूल येथील इमारतीचे दुस-या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करणे या कामासाठी यापूर्वी नेमणूक केलेल्या वास्तुविशारद मे. कारेकर ॲन्ड असोसिएटस, बंगलोर यांच्याकडून सदर काम काढून घेण्यास तसे त्यांना कळविण्यास व भौतिकशास्त्र संकूल येथील इमारतीचे दुसऱ्या मजल्याचे (वाढीव) बांधकाम करणे ऐवजी सामाजिकशास्त्रे संकूल दुसऱ्या (वाढीव) मजल्याचे बांधकाम करणे या कामासाठी मा. कुलपती कार्यालय, मुंबई यांनी निश्चित केलेल्या वास्तुविशारद पॅनेलमधून Ar. Asmi Sindgi वास्तुविशारद यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(५)] | **प्रस्तुत विद्यापीठामधील संगणक विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना निकालाच्या कालावधीमध्ये कार्यालयीन कामाव्यतिरीक्त केलेल्या जादा कामाचा मोबदला मिळण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामधील परीक्षा व मुल्यमापन विभागांतर्गत संगणक विगातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना विद्यापीठाचे निकाल वेळेत लावण्यासाठी विभागाकडील कामाचे स्वरूप पाहता व विभागातील निकाला संबंधित कामे वेळेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने कार्यालयीन कामाच्या वेळेव्यतिरीक्त जादा वेळ काम करण्याच्या कार्यालयीन आदेशानुसार संगणक विभागातील कंत्राटी संगणक तज्ञ व लेखनिक यांना जादा वेळ कार्यालयात थांबून, रात्रभर तसेच सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहून निकालाची कामे करणे आवश्यक असते.<br>प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी मनुष्यबळ पुरवठा, रक्षक सिक्युरिटी अँन्ड सर्व्हिसेस प्रा. लिमिटेड या पुरवठाधारक कंपनीकडून करण्यात येतो. पुरवठाधारक कंपनी व विद्यापीठ यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार पुरवठाधारक कंपनी विद्यापीठाअंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी संणक तज्ञ, संगणक लेखनीक डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना जादा कामाचा माबदला अदा करण्याबाबतचा करार करण्यात आलेला नसल्यामुळे कंपनीकडून अशा पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जादा कामाचा मोबदला अदा करण्यात येत नाही.<br>सबब, संगणक विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन विभाग यांच्या कार्यालयीन आदेशास अनुसरून कार्यालयीन वेळे व्यतिरीक्त तसेच सुट्टीच्या दिवशी, जादा वेळ (रात्रभर) थांबून निकालाची कामे करावी लागत आहेत. व्यवस्थापन परिषदेच्या दि.२२ मार्च, २०२४ रोजीच्या १७० व्या बैठकीमध्ये विद्यापीठ आस्थापनावरील नियमित वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांकरिता रू. ९५/- (प्रति तास) या प्रमाणे जादा कामाचा मोबदला अदा करण्याविषयी ठराव करण्यात आलेला आहे. संगणक विभागामध्ये काम करत असणाऱ्या कंत्राटी संगणक तज्ञ, संगणक लेखनिक व डाटा एन्ट्री ऑपरेटर या कर्मचाऱ्यांना त्यांनी काम केलेल्या प्रत्यक्ष जादा कामाच्या तासांचा मोबदला प्रति तास रू. ९५/- याप्रमाणे जानेवारी २०२५ या कालावधीपासून अदा करण्यास पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता असावी, सदरचा खर्च परीक्षा व मूल्यमापन विभागाकडील अंदाजपत्रकीय शिर्षक Over Time Charges या अंतर्गत खर्ची टाकण्यास मान्यता असावी. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठामधील संगणक विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना निकालाच्या कालावधीमध्ये कार्यालयीन कामाव्यतीरीक्त केलेल्या जादा कामाचा मोबदला देण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**१. अतिकालीक भत्ता आदा करण्यासाठी दि.२९/०४/२०२४ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या नियमावलीचे काटेकोर पालन करण्यात यावे.**<br>**२. एका आर्थिक वर्षातील जादा कामाच्या तासाची कमाल मर्यादा २०० तास इतकी राहील.**<br>**३. जादा कामाचे दर प्रती तास रु.९५/- इतके राहतील.**<br>**४. परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभागाकडील फक्त संगणक विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सदर ठराव लागू राहील.**<br>**५. सदर ठरावाची अंमलबजावणी ही दि.१४/११/२०२५ पासून करण्यात यावी.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(६)] | **ॲड उषा नंदकुमार पवार यांनी दि. ०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेसमोर "अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या पाल्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे" अशा मांडलेल्या प्रस्तावाची अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.** | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

टिपणी: दि.०३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमध्ये ॲड उषा नंदकुमार पवार यांनी अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या पाल्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे असा प्रस्ताव सादर केला असता अधिसभेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

> सदरचा प्रस्ताव ॲड उषा नंदकुमार पवार यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

याबाबत कार्यालयीन निवेदन खालीलप्रमाणे आहे.

संदर्भ: १) प्रस्तूत विभागाचे परिपत्रक क्र. ४०/२०२५ दि. १३ ऑक्टोंबर, २०२५ जा.क्र. पुअहोसोविसो/प.व.व.मू.म/२०२५/१९९९.

२) श्री. ओमप्रकाश भुपालसिंह उर्फ पवन राजे निंबाळकर, लोकसभा सदस्य यांचे दि. ०३/१०/२०२५ रोजीचे पत्र.

३) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सोलापूर यांचे दि. ३०/०९/२०२५ रोजीचे पत्र.

४) प्रणिती सुशीलकुमार शिंदे यांचे दि. ३०/०९/२०२५ रोजीचे पत्र.

५) दि.०३/१०/२०२५ रोजीच्या प्रस्तूत विद्यापीठाच्या अधिसभेच्या बैठकीमध्ये परीक्षा शुल्क माफीसंदर्भात झालेली चर्चा.

उपरोक्त संदर्भास अनुसरुन सदरचा विषय दि.०८ ऑक्टोंबर, २०२५ रोजीच्या परीक्षा मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.०७ | सोलापूर जिल्हयातील अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमूळे माहे ऑक्टो/नोव्हे-२०२५ च्या विद्यापीठीय परीक्षा यापूर्वीच पूढे ढकलण्यात आलेल्या आहेत. तसेच परीक्षा शुल्क माफ करणेसाठी अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमूळे बाधित आसणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे परीक्षा अर्जासोबत भरावे व सदर शुल्क शासनाकडून प्राप्त होताच ते महाविद्यालयास परत करण्याबाबतचे परिपत्रक सर्व संबंधित महाविद्यालयांना निर्गमित करावे असे सर्वानुमते ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील ऑक्टोंबर/नोव्हेंबर या सत्रातील विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्कापोटी एकूण ८,३२,६०,७०४/- (अक्षरी रुपये आठ कोटी बत्तीस लाख साठ हजार सातशे चार फक्त) इतकी रक्कम विद्यापीठाकडे जमा केली आहे. उक्त ठरावाच्या अनुषंगाने, सदर रक्कमेची प्रतिपूर्ती संबंधित विद्यार्थ्यांना महाविद्यालयामार्फत करणेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे जा.क्र.पुअहोसोविसो /व्ही.सी/परीक्षा व मूल्यमापन विभाग/२०२५/१३२ दि.०७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे.<br>सबब, ॲड उषा नंदकुमार पवार यांनी दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेसमोर "अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या पाल्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे" अशा मांडलेल्या प्रस्तावाची अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव: | **अधिसभा सदस्या ॲड उषा नंदकुमार पवार यांनी ठराव क्र.१६ नुसार पाठविलेल्या सुचनेच्या अनुषंगाने दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभा बैठकीत व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(७)] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरात विधी संकुलाची (School of Law) निर्मिती करुन त्यात पदवी व पदव्युत्तर विधी अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसरामध्ये सद्यस्थितीत एकूण ११ संकुले अस्तित्वात आहेत. सदरील संकुलांतर्गत कला, ललितकला, सामाजिकशास्त्रे, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान इ. विषयांशी संबंधित अभ्यासक्रमांचे अध्ययन व अध्यापन केले जाते. सध्याच्या युगात कायदा व सुव्यवस्थेचे ज्ञान समाजातील प्रत्येक घटकांना अवगत असावे याकरिता तसेच या भागाचा शैक्षणिक विकास होणे हेतू विधी अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा मानस आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३ (१) (च) मध्ये पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरु करण्यासंबंधी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे अशी तरतूद असल्याने प्रस्तुत विद्यापीठ परिसरात विधी संकुलाची (School of Law) निर्मिती व त्यात पदवी व पदव्युत्तर विधी अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्याबाबत दि.१७/१०/२०२५ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र. १४ ठेवला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.<br>"प्रस्तुत विद्यापीठ परिसरात विधी संकुलाची (School of Law) निर्मिती व त्यात पदवी व पदव्युत्तर विधी अभ्यासपाठ्यक्रम सुरु करण्याबाबत सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसरात विधी संकुलाची (School of Law) निर्मिती व त्यात पदवी व पदव्युत्तर विधी अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ. | संलग्नता विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरात विधी संकुलाची (School of Law) निर्मिती करुन त्यात पदवी व पदव्युत्तर विधी अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(८)] | **प्रस्तुत विद्यापीठातील कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक यांना देण्यात येणारा जादा तास कामाच्या मोबदला एका आर्थिक वर्षात २०० तास देणेबाबत व्यवस्थापन परिषदेचा ठराव झालेला आहे. परंतु मा. कुलगुरु कार्यालय व मा.प्र-कुलगुरु कार्यालय येथील अंगरक्षक यांचे जादा कामाचे तास २०० पेक्षा जास्त झालेले आहेत. २०० तासांपेक्षा जादा तास केलेल्या कामाचा मोबदला देण्याची विचारार्थ.**<br>टिपणी: कंत्राटी सुरक्षा रक्षकांचे माहे एप्रिल ते जुन२०२५ या कालावधीतील जादा कामाचा मोदबला मिळणेबाबत रितसर प्रशासकिय मान्यता घेऊन वित्त व लेखा विभागास कळविण्यात आले होते. तद्नंतर वित्त व लेखा विभागाने सदर देयके व अनुषांगिक कागदपत्रे पडताळणी केली असता, मा. कुलगुरु कार्यालय व मा. प्र-कुलगुरु कार्यालय येथील कंत्राटी सुरक्षा रक्षक यांचे पुढील प्रमाण जादा कामाचे तास झालेले आहेत.<br>१) श्री. कोळी बी.के., मा. कुलगुरु कार्यालय यांचे ३३० जादा कामाचे तास.<br>२) श्री. जाधव आर.के., मा. प्र- कुलगुरु कार्यालय यांचे २४६ जादा कामाचे तास<br>प्रस्तुत विद्यापीठातील नियमित शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना अतिकालीक भत्ता आदा करण्याबाबतची सुधारित नियमावली (दि.०१/०४/२०२५ पासून) मधील मुद्दा क्र.०७ मध्ये "अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एका आर्थिक वर्षातील अतिकालीक भत्त्याची (Over -Time) कमाल मर्यादा २०० तास इतकीच राहील" असे नमूद करण्यात आले आहे. नुसार (सोबत नियमावली जोडली आहे.) व्यवस्थापन परिषदेच्या दि.२२ मार्च,२०२४ च्या बैठकीती ठराव क्र.०१ च्या अनुषंगाने जादा काम केल्यानंतर मिळणाऱ्या भत्यांची मर्यादा ही आर्थिक वर्षामध्ये २०० तास याप्रमाणे राहील.<br>उक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, मा. कुलगुरु कार्यालय व मा. प्र- कुलगुरु कार्यालय येथील सुरक्षा रक्षकांचे जादा कामाचे तास हे एका आर्थिक वर्षात २०० होणे अपेक्षित होते. परंतु सदर कं. कर्मचाऱ्याचे अनुक्रमे १) ३३० व २) २४६ इतके जादा कामाचे तास झालेले आहेत.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक यांना देण्यात येणारा जादा तास कामाच्या मोबदला एका आर्थिक वर्षात २०० तास देणेबाबत व्यवस्थापन परिषदेचा ठराव झालेला आहे. परंतु मा.कुलगुरु कार्यालय व मा. प्र-कुलगुरु कार्यालय येथील अंगरक्षक यांचे जादा कामाचे तास २०० पेक्षा जास्त झालेले आहेत. २०० तासांपेक्षा जादा तास केलेल्या कामाचा मोबदला देण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **मा. कुलगुरु कार्यालय व मा. प्र-कुलगुरु कार्यालय येथील अंगरक्षक यांचे जादा कामाचे तास २०० इतकेच राहतील असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [९(९)] | **शिवरत्न शिक्षण संस्था, शंकरनगर-अकलूज संचलित मदनसिंह मोहिते पाटील विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा, जि. सोलापूर यांचेकडे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम, २०२२ मधील तदानुषंगिक तरतूदीनुसार प्रस्तावास मान्यता देण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्वीकारुन राज्य शासनाकडे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्याकरिता शिफारस करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: शिवरत्न शिक्षण संस्था, शंकरनगर-अकलूज, जि. सोलापूर संचलित मदनसिंह मोहिते पाटील विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा, जि. सोलापूर यांचेकडे व्यवस्थापनाचे हस्तांतरणाचा प्रस्ताव या कार्यासनास प्राप्त झाला आहे. त्यावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम, २०२२ मधील नियम क्र.२ व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देताना अनुसरावयाची कार्यपध्दती यातील मुद्दा क्र. ४ व ५ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे:<br>"(४) विद्यमान व्यवस्थापनाकडून आणि नवीन व्यवस्थापनाकडून अशा प्रकारे प्राप्त झालेल्या आणि त्यांच्या सर्व सदस्यांनी यथोचितरीत्या स्वाक्षरी केलेल्या प्रस्तावांची अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि व्यवस्थापन परिषदेस तिच्या विचारार्थ व मान्यतेसाठी पाठवण्यात येईल.<br>(५) विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद, त्यावर विचार करील आणि राज्य शासनाकडे शिफारस करील, जे प्रस्ताव पुढील शर्तीची पूर्तता करतात अशा नवीन व्यवस्थापनाच्या प्रस्तावांचीच शिफारस करण्यात येईल."<br>यानुसार दिनांक २७/०५/२०२५ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विषय क्र. ३ अन्वये विषय ठेवला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला.<br>"शिवरत्न शिक्षण संस्था, शंकरनगर-अकलूज संचलित मदनसिंह मोहिते-पाटील विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा, जि. सोलापूर यांचेकडे व्यवस्थापनाचे हस्तांतरण प्रस्तावावर अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते चर्चा करण्यात आली.<br>सदर विषयाबाबत नियमानुसार छाननी समिती घेऊन त्याचा अहवाल सादर करण्याचे ठरले. खालीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात आली.<br>१. डॉ. प्रशांत पवार-अध्यक्ष<br>२. डॉ. राजीव मेंते - सदस्य<br>३. डॉ. वसंत कोरे-सदस्य "<br>सदर छाननी समितीची पहिली बैठक दिनांक २५/०६/२०२५ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत समितीने प्रस्तावात काढलेल्या त्रुटी संबंधित महाविद्यालयास या कार्यासनाच्या दिनांक २७/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | कळविण्यात आले. तद्नंतर संबंधित महाविद्यालयाने दिनांक ०२/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्रुटीपूर्तता केली. सदर त्रुटीपूर्तता अहवाल छाननी समितीच्या दि.२५/०८/२०२५ रोजीच्या बैठकीत ठेवला असता, छाननी समितीने सदर अहवालाची पडताळणी करुन खालीलप्रमाणे ठराव पारित केला.<br>"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम, २०२२ मधील तदानुषंगिक तदतूदीनुसार सदर प्राप्त प्रस्ताव परिपूर्ण असल्याने, आगामी होणाऱ्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विषय ठेवण्यास सदर समिती शिफारस करित आहे."<br>उक्त ठरावाच्या अनुषंगाने दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विषय क्र. ५ अन्वये विषय ठेवला असता, सदर विषयावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.<br>"शिवरत्न शिक्षण संस्था, शंकरनगर-अकलूज संचलित मदनसिंह मोहिते पाटील विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा, जि. सोलापूर यांचेकडे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम, २०२२ मधील तदानुषंगिक तरतुदीनुसार प्रस्तावास मान्यता देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेकडे सर्वानुमते शिफारस करण्यात आली."<br>सबब, शिवरत्न शिक्षण संस्था, शंकरनगर-अकलूज संचलित मदनसिंह मोहिते पाटील विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा, जि. सोलापूर यांचेकडे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम, २०२२ मधील तदानुषंगिक तरतूदीनुसार प्रस्तावास मान्यता देण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्वीकारुन राज्य शासनाकडे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्याकरिता शिफारस करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **शिवरत्न शिक्षण संस्था, शंकरनगर-अकलूज संचलित मदनसिंह मोहिते पाटील विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा, जि.सोलापूर यांचेकडे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून व्यवस्थापनाचे हस्तांतरण करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरुप परिनियम, २०२२ मधील तदानुषंगिक तरतूदीनुसार प्रस्तावास मान्यता देण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन राज्य शासनाकडे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्याकरिता सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(१०)] | **G.S.T. Exemption करीता G. S. T. कार्यालयाकडून Advance Ruling घेणे व त्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन घेण्याकरीता सनदी लेखापाल श्री. पंकज खेर (G.S.T. तज्ञ सल्लागार) यांची नियुक्ती होवून रु.६०,०००/- वार्षिक मानधन निश्चित करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामार्फत विविध प्रकारची देयके आदा करण्यात येतात. सदर देयकामध्ये G.S.T. ची रक्कम नियमानुसार आदा करण्यात येते. त्यामध्ये विविध मक्तेदार/फर्म तसेच इतर देयकांचा समावेश होतो. सनदी लेखापाल श्री. पंकज खेर हे नागपूर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे G.S.T. तज्ञ सल्लागार म्हणून काम पाहत आहेत. श्री. पंकज खेर यांच्यासोबत झालेल्या चर्चेनुसार प्रवेश व परीक्षा तसेच कंत्राटी कर्मचारी व सुरक्षा पुरवठादार यांच्या देयकावर G.S.T. माफ असल्याचे कळविले आहे. G.S.T. कार्यालयाकडून Advance Ruling घेणे व त्यासंदर्भात वेळोवेळी सविस्तर मार्गदर्शन घेणेयाकरीता सनदी लेखापाल श्री. पंकज खेर यांची G.S.T. तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करणे उचित वाटते. त्याकरीता त्यांनी वार्षिक फी रु.६०,०००/- + G.S.T. मिळणेबाबत विनंती केली आहे. G. S. T. कार्यालयाकडून सदर देयकावर G.S.T. माफ झाल्यास वार्षिक अंदाजे १ ते २ कोटी रुपयांची बचत होणार आहे.<br>सबब, G.S.T. Exemption करीता G. S. T. कार्यालयाकडून Advance Ruling घेणे व त्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन घेण्याकरीता सनदी लेखापाल श्री. पंकज खेर (G.S.T. तज्ञ सल्लागार) यांची नियुक्ती होवून रु.६०,०००/- वार्षिक मानधन निश्चित करण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **G.S.T. Exemption करीता G. S. T. कार्यालयाकडून Advance Ruling घेणे व त्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन घेण्याकरीता सनदी लेखापाल श्री. पंकज खेर (G.S.T. तज्ञ सल्लागार) यांची नियुक्ती करुन त्यांना रु.६०,०००/- इतके वार्षिक मानधन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद